॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

**✻ सुविचार ✻**
गर्दीचा हिस्सा बनण्यापेक्षा
गर्दीचे कारण बना.

▪ अहिल्यानगर ▪ शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ ▪ वर्ष ७ वे ▪ अंक ७९ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ▪ 9420802145

## वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### भाकर

कुणालाच नाही घेणेदेणे
बळीराजाची करपली भाकर
सगळे पडले विचारात
कुणावर फोडू खापर?

नोकर बनले मालक
मालक बनले नोकर
यांच्यातोंडी आमच्यासाठी
पाच वर्षांनी साखर !

# पेपरफुटीच्या सखोल तपासासाठी एसआयटी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विद्यार्थ्यांना आश्वासन । एमपीएससी विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या मान्य

**● मुंबई । वीरभूमी –** एमपीएससी परीक्षेच्या पेपरफुटीच्या विरोधात विद्यार्थ्यांनी पुकारलेल्या आंदोलनापुढे सरकारला अखेर नमते घ्यावे लागले. विद्यार्थ्यांच्या सर्व प्रमुख मागण्या मान्य झाल्या आहेत. एमपीएससीच्या २०२५ च्या मुख्य परीक्षेच्या पेपरची फेरतपासणी करण्यात येणार असून तोवर मुलाखतीस स्थगिती देण्यासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी मंजुरी दिली. पेपरफुटीचा एसआयटीकडून सखोल तपास करण्यात येणार असून, एकाही दोषीला आपण सोडणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. तसेच भविष्यात होणा-या परीक्षा १०० टक्के पारदर्शकपणे होतील, अशी हमीही त्यांनी दिली.



एमपीएससीच्या पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांच्या संयमाचा बांध फुटला होता व आंदोलनाचा वणवा वाढत चालला होता. या पार्श्वभूमीवर स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज आंदोलकांच्या शिष्टमंडळासोबत चर्चा केली. तब्बल दीड तास चाललेल्या बैठकीनंतर विद्यार्थ्यांच्या बहुतांश सर्व प्रमुख मागण्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य केल्या. एमपीएससीबाबत ज्या घटना घडल्या, त्यानंतर झालेला विद्यार्थ्यांचा उद्रेक योग्य आहे. वेळोवेळी ज्या सुधारणा करायला हव्या होत्या, त्या झाल्या नाहीत. त्यामुळे हा उद्रेक झाला. मात्र आता गोष्टी नीट करायची संधी मिळाली. पेपरफुटीचा प्रकार बाहेर आल्यानंतर पोलिसांना पूर्ण स्वातंत्र्य दिले. एसआयटीमार्फत योग्य तपास सुरू आहे. अजून या मागे कोण आहे हे शोधण्याचे काम सुरू आहे.

औषध निरीक्षक परीक्षा पेपरफुटीचा सखोल तपास सुरू आहे. तसेच ग्रुप बी, ग्रुप सी परीक्षांची पण चौकशी केली जाईल. मी दोन व्यवस्था उभ्या करतो. एकात तुम्ही तक्रार द्यायची. तिथे अडचण दिसली की ती एसआयटीकडे पाठवून चौकशी करू. पेपरचे रिचेकिंग निश्चित करायला लावू, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

विद्यापीठात जशा उत्तरपत्रिका पाहायला मिळतात. त्याच धर्तीवर एमपीएससीच्या उत्तरपत्रिका देखील आरटीआय अंतर्गत बघायला मिळाव्यात ही मागणी योग्य आहे. आपण याबाबत एमपीएससीला सूचना करू. मुलाखतींबाबतही मार्गदर्शक सूचना ठरविल्या पाहिजेत. व्ही.राधा समितीला आपण त्याबाबत शिफारस करायला सांगू, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

### व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली समिती

▪ सरकारने व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती बनविली आहे. पोलिस महासंचालक सदानंद दाते देखील या समितीत आहेत. ही समिती स्थानिक पातळीवर जाऊन संवाद साधणार आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे सर्व मुद्दे या समितीसमोर मांडावेत असेही मुख्यमंत्री म्हणाले.

### पुरावे दिल्यास अध्यक्ष, सचिवांची चौकशी करू

▪ एमपीएससीचे अध्यक्ष, सचिव यांच्याविरोधात कोणताही पुरावा दिला तर त्या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी केली जाईल. जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई होणारच, कुणालाही वाचवण्याचा प्रश्न येत नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. परीक्षार्थ्यांनी अध्यक्ष आणि सचिवांचा राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे.

## SPOT NEWS

### अधिकाऱ्यांना दुपारी कार्यालयात हजर राहणे बंधनकारक

**● मुंबई –** महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून आता जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार यांना गुरूवार दि. १० सप्टेंबरपासून स्वत: च्या कार्यालयात दुपारी ३ वा ते ५ वा पर्यंत नागरिकांच्या प्रशासकीय अडी अडचणीसाठी थांबावेच लागणार असून या संदर्भातील शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाने जारी केला आहे. प्रशासनाला अधिक लोकाभिमुख करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व कार्यालयप्रमुखांना सोमवार ते शुक्रवार दररोज दुपारी ३ ते ५ या वेळेत आपल्या कार्यालयात हजर राहून नागरिकांच्या प्रत्यक्ष भेटी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. नागरिकांच्या तक्रारींचे स्थानिक व क्षेत्रीय पातळीवरच जलद, प्रभावी आणि कायदेशीर पद्धतीने निराकरण व्हावे असे कडक निर्दे श लेखी पत्राद्वारे दिले आहेत. या भेटीच्या वेळेत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक तक्रारीची त्वरित नोंद घेऊन नियमानुसार तात्काळ कार्यवाही करावी, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. नागरिकांना ही वेळ सहज समजावी यासाठी प्रत्येक कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर आणि दालनाबाहेर ‘अभ्यागतांची भेट घेण्याची वेळ: सोमवार ते शुक्रवार, दुपारी ३ ते ५ असा स्पष्ट फलक लावणे अनिवार्य करण्यात आले आहे.

### माधुरी’ हत्तीण पुन्हा नांदणी मठात येणार

**● मुंबई –** नांदणी (ता. शिरोळ) येथील मठाची ओळख असलेल्या ‘महादेवी उर्फ माधुरी’ हत्तिणीच्या वापसीचा निर्णय आता अंतिम टप्प्यात आला आहे. बुधवारी झालेल्या उच्चस्तरीय समितीच्या ऑनलाइन सुनावणीत मठात उपलब्ध करून दिलेल्या सुविधांचा सविस्तर लेखाजोखा मांडण्यात आला. नांदणी मठ, महाराष्ट्र शासन आणि ‘वनतारा’ यांच्या प्रतिनिधींनी माधुरीला परत आणण्यासाठी सकारात्मक भूमिका घेतली. सुनावणी पूर्ण झाली असून समितीने निकाल राखून ठेवला आहे. २३ जूनला उच्चस्तरीय समितीचे सदस्य, सेंट्रल झूचे सदस्य, महाराष्ट्र शासन, वनविभागाचे प्रतिनिधी यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात आली आहे.

# भरधाव आयशरची वॅगनरला धडक; एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू

## नगर-कल्याण महामार्गावरील भाळवणी शिवारात भीषण अपघात

**● पारनेर । वीरभूमी –** नगर-कल्याण महामार्गावर भाळवणी गावच्या शिवारात हॉटेल संदीपसमोर गुरुवारी (दि. १०) पहाटे दोनच्या सुमारास आयशर टेम्पो आणि वॅगनर कारची समोरासमोर जोरदार धडक झाली. या भीषण अपघातात वॅगनरमधील एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला.



मृतांमध्ये शकील मोहम्मद शेख (वय ४५), सलमा शकील शेख (वय ४२), ईकबाल शकील शेख (वय २३) आणि सुमैय्या शकील शेख (वय १८, सर्व रा. गेट नं. ६, नुराणी मशीदसमोर, मालवणी, मुंबई) यांचा समावेश आहे.

याबाबत अल्ताफ शब्बीर शेख (वय ५२, रा. वाबळे कॉलनी, मुकुंदनगर, अहिल्यानगर) यांनी पारनेर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार शकील शेख हे कुटुंबासह अहिल्यानगर येथे नातेवाईकांना भेटण्यासाठी वॅगनर कार (क्र. एमएच ४७ सीके १३०८) मधून येत होते. पहाटे दोनच्या सुमारास भाळवणी शिवारातील हॉटेल संदीपसमोर त्यांच्या कारला आयशर टेम्पो (क्र. एमएच १६ सीडी २७४७) ने समोरून जोरदार धडक दिली.

धडकेनंतर वॅगनरचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. कारमधील शकील शेख, सलमा शेख, ईकबाल शेख आणि सुमैय्या शेख गंभीर जखमी होऊन बेशुद्ध अवस्थेत पडले होते. घटनास्थळी जमलेल्या नागरिकांनी तत्काळ रुग्णवाहिकेला माहिती दिली. त्यानंतर चौघांना पारनेर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर सकाळी १० वाजून ५६ मिनिटांनी चौघांनाही मृत घोषित केले.

अपघातानंतर आयशर चालक घटनास्थळी न थांबता पसार झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. अज्ञात चालकाविरुद्ध पारनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पोलिसांकडून अपघाताचा पुढील तपास सुरू आहे.

# राज्यातील ग्रामपंचायतींवर विस्तार अधिकारीच राहणार प्रशासक

**● मुंबई । वीरभूमी –** राज्यभरातील सुमारे १५ हजार ग्रामपंचायतींची मुदत संपली असून तत्कालीन सरपंचांची प्रशासक म्हणून केलेल्या नियुक्तीची मुदतही संपली असल्याने आता ग्रामपंचायतीवर विस्तार अधिकारीच प्रशासक म्हणून राहणार आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यातील जानेवारी आणि फेब्रुवारी २०२६ पर्यंत ४३३ ग्रामपंचायतींचा यामध्ये समावेश होता. या ठिकाणी सुरुवातीला विस्तार अधिका-यांची आणि त्यानंतर शासनाच्या आदेशानुसार तत्कालीन सरपंचांची प्रशासक व सदस्यांची प्रशासक मंडळ म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. कोल्हापूर जिल्ह्यातील मुदत संपलेल्या ४३३ ग्रामपंचायतींवर बाराही तालुक्यांतील विस्तार अधिका-यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्याचा कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन यांनी घेतलेल्या निर्णयावर ग्रामविकास विभागाने शिक्कामोर्तब केले आहे. हाच निर्णय राज्यभर लागू करण्यात आला असून याबाबतची अधिसूचना नुकतीच राजपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

दरम्यान, या नियुक्तीच्या आदेशातील दिलेली सहा महिन्यांची मुदत २२ ऑगस्ट रोजी संपुष्टात आली. त्यामुळे ग्रामपंचायतींचा कारभार नेमका कोणी पाहायचा, असा प्रश्न निर्माण झाला होता. याबाबत कोल्हापूर जिल्हा परिषदेने ग्रामविकास विभागाकडे मार्गदर्शन मागितले होते.

शासनाकडून मार्गदर्शन न आल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन यांनी त्यांच्या अधिकारात ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जयवंत उगले यांच्याशी चर्चा करून बाराही पंचायत समित्यांमध्ये कार्यरत असणा-या पंचायत, शिक्षण, आरोग्य आणि कृषी विभागाच्या विस्तार अधिकाऱ्यांकडे ४३३ ग्रामपंचायतींच्या प्रशासकपदाचा कार्यभार दिला होता. हाच निर्णय राज्यभरासाठी लागू झाला.

सहा महिन्यांसाठी विस्तार अधिकारी हे प्रशासक म्हणून राहणार असून त्याआधी जर ग्रामपंचायतींच्या निवडणुका झाल्या तर त्यांचे प्रशासकपद संपुष्टात येणार आहे असे अधिसूचनेमध्ये नमूद करण्यात आले आहे.

# पुढील चार दिवस पावसाचे! राज्यात वादळी पावसासह विजांचा कडकडाट

## राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाची माहिती । अनेक जिल्ह्यांना यलो अलर्ट

**● मुंबई । वीरभूमी –** राज्यातील काही भागांत पुढील चार दिवस वादळी वाऱ्यासह पाऊस आणि विजांच्या कडकडाटाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. ११ ते १४ सप्टेंबरदरम्यान विविध जिल्ह्यांत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज असून, काही जिल्ह्यांना ‘यलो लर्ट’ देण्यात आला आहे.

११ सप्टेंबरला नाशिक घाट परिसरासह परभणी, हिंगोली, नांदेड, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांत वादळी पावसाची शक्यता आहे. या जिल्ह्यांना यलो लर्ट देण्यात आला आहे.

१२ सप्टेंबरला धुळे, नाशिक घाट व नाशिक, पालघर, ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर, रायगड, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, बुलढाणा, जालना, बीड, धाराशिव, सोलापूर, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली, वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह पाऊस आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.

१३ सप्टेंबरला कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील अनेक भागांत पावसाचा अंदाज आहे. पालघर, ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर, रायगड, पुणे घाट, पुणे, सातारा घाट, सातारा, रत्नागिरी, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, बुलढाणा, जालना, बीड, धाराशिव, परभणी, हिंगोली, वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ आणि वर्धा या जिल्ह्यांना ‘यलो लर्ट’ देण्यात आला आहे. १४ सप्टेंबरला नाशिक घाट, पुणे घाट, पुणे, अहिल्यानगर आणि रत्नागिरी या जिल्ह्यांत वादळी पावसाची शक्यता असून, या भागांसाठीही ‘यलो लर्ट’ जारी करण्यात आला आहे.



वादळी वाऱ्यासह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. विजांचा कडकडाट सुरू असताना नागरिकांनी शक्यतो घरातच राहावे. झाडे, विजेचे खांब किंवा इतर धोकादायक ठिकाणी आसरा घेणे टाळावे; तसेच प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

SPOT NEWS

## रोहित वाघ, भारती आचार्य आणि कीर्ती चक्रवर्तीची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अहिल्यानगर रायफल शूटिंग क्लबच्या खेळाडूंनी नेमबाजीच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन नेमबाजी स्पर्धेत अहिल्यानगर शूटिंग क्लबचा खेळाडू रोहित संतोष वाघ याने १० मीटर एअर पिस्टल प्रकारात दमदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. त्याच्या या कामगिरीमुळे देहरादून येथे होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी रायफल शूटिंग स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील एमआयडीसी चिकलठाणा परिसरातील ईगल स्टार शूटिंग अकॅडमी येथे ४ सप्टेंबर २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन नेमबाजी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत १० मीटर एअर पिस्टल प्रकारात रोहित संतोष वाघ याने ६०० पैकी ५६४ गुणांची शानदार नोंद करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. सातत्यपूर्ण सराव, अचूक लक्ष्यभेद आणि उत्कृष्ट मानसिक एकाग्रतेच्या जोरावर त्याने ही कामगिरी साध्य केली. याच स्पर्धेत अहिल्यानगर रायफल शूटिंग क्लबच्या भारती रामदास आचार्य हिने एअर रायफल प्रकारात प्रभावी कामगिरी केली. तिने ६०० पैकी ५७९ गुण मिळवत चौथा क्रमांक पटकावला. तिच्या या कामगिरीचेही क्रीडा क्षेत्रातून कौतुक होत आहे. दरम्यान, अहिल्यानगरच्या नेमबाजांनी राष्ट्रीय स्तरावरही आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली आहे. २८ व्या अखिल भारतीय कुमार सुरेंद्र सिंह आंतरशालेय नेमबाजी राष्ट्रीय स्पर्धा २०२६ भोपाळ येथे पार पडली. या स्पर्धेत कीर्ती शैलेंद्र चक्रवर्ती हिने १० मीटर एअर रायफल युथ प्रकारात उल्लेखनीय कामगिरी केली. कीर्तीने या स्पर्धेत ४०० पैकी ३९३ गुण मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली. तिच्या या कामगिरीच्या जोरावर तिला टीम सुवर्णपदक, तसेच वैयक्तिक गटात कांस्यपदक मिळाले. राष्ट्रीय स्तरावरील या यशामुळे कीर्तीची पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. रोहित वाघ, भारती आचार्य आणि कीर्ती चक्रवर्ती हे खेळाडू खुलताबाद येथील चिश्तिया कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात शिक्षण घेत असून, अहिल्यानगर येथील वाडिया पार्क शूटिंग क्लबमध्ये नेमबाजीचे प्रशिक्षण घेत आहेत.

## जायंट्स वेलफेअर फौंडेशन फेडरेशनची तिसरी कौन्सिल सभा उत्साहात

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

जायंट्स वेलफेअर फौंडेशन फेडरेशन 2- d 2B ची संयुक्त तिसरी कौन्सिल सभा छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. फेडरेशनच्या कार्याचा आढावा, विविध सामाजिक उपक्रमांना चालना देणे, ग्रुप व सदस्यवृद्धी तसेच आगामी उपक्रमांच्या नियोजनावर यावेळी चर्चा करण्यात आली. यावेळी चितळे उद्योग समूहाचे मुख्य संचालक तथा जायंट्स सेंट्रल कमिटी सदस्य गिरीश चितळे यांनी मार्गदर्शन करताना जायंट्स ही केवळ एक संस्था नसून एक परिवार असल्याचे सांगितले. प्रत्येक ग्रुपने आपल्या कार्याचा विस्तार करण्याबरोबरच ग्रुप वृद्धी आणि सदस्य वृद्धीवर विशेष भर देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. समाजसेवेचे कार्य अधिक जोमाने आणि व्यापक स्वरूपात करण्याचे आवाहनही त्यांनी केले. जायंट्सच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असून, त्याचा अधिकाधिक समाजघटकांना लाभ मिळण्यासाठी प्रत्येक सदस्याने सक्रिय सहभाग घेणे आवश्यक असल्याचे चितळे यांनी नमूद केले. आगामी बेंगळुरू कन्व्हेन्शनमध्ये जास्तीत जास्त संख्येने सदस्यांनी सहभागी होण्यासाठी रजिस्ट्रेशन करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे यांनी अहिल्यानगर जायंट्स ग्रुपच्या कार्याचा आढावा मांडला. अहिल्यानगर ग्रुपने गेल्या ४० वर्षांपासून शहरामध्ये विविध सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य उभे केले आहे, असे त्यांनी सांगितले. समाजसेवेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवत जायंट्सने सामाजिक चळवळ म्हणून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली असून, समाजसेवेत ही संस्था नेहमीच अग्रेसर राहिली आहे.

# गणेशोत्सवात डीजेचा आग्रह नको

### आमदार मोनिका राजळे यांचे मंडळांना आवाहन । पारंपरिक वाद्यांसह शिस्तीत उत्सव साजरा करण्याचे आवाहन

**● पाथर्डी । वीरभूमी –**

आगामी गणेशोत्सव व नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पाथर्डी पोलीस ठाण्याच्या आवारात शांतता समितीची बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. गणेशोत्सवातील डीजे बंदीबाबत प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाचा सकारात्मक दृष्टीने स्वीकार करून गणेश मंडळांनी पारंपरिक वाद्यांच्या साथीने उत्सव साजरा करावा. तरुणांनी डीजेसाठी अधिक आग्रह धरू नये, असे आवाहन आमदार मोनिका राजळे यांनी केले.



आपली संस्कृती व परंपरा जपण्यासाठी गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. उत्तम सादरीकरण, शिस्तबद्ध आयोजन आणि नियमांचे पालन करणाऱ्या मंडळांना पारितोषिके देण्यात येतील, अशी माहितीही आमदार राजळे यांनी दिली.

बैठकीस अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू, पोलीस निरीक्षक आनंद कोकरे, नायब तहसीलदार दिग्विजय पाटील, नगराध्यक्ष अभय आव्हाड, नगरपालिकेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे यांच्यासह विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सचिन वायकर, प्राचार्य अजय भंडारी, ॲड. हरिहर गर्जे, पत्रकार राजेंद्र देवढे, सामाजिक कार्यकर्ते सुनील पाखरे, मनसेचे संतोष जिरेसाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे, बाबू बोरुडे आदींनी विविध प्रश्न व सूचना मांडत प्रशासनाचे लक्ष वेधले.

आमदार मोनिका राजळे म्हणाल्या की, दैनंदिन अडचणी सोडविण्यासाठी केवळ प्रशासनावर अवलंबून न राहता नागरिकांनीही स्वयंशिस्त पाळणे गरजेचे आहे. गावचे गावपण आणि शहराचे सौंदर्य जपण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा.

शहरातील वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या हातगाड्या, पथारीवाले, रस्त्याच्या मधोमध होणारे वाहन पार्किंग तसेच धोकादायक पद्धतीने लावण्यात येणारे फ्लेक्स बोर्ड यांच्यावर पोलीस व पालिका प्रशासनाने शिस्त लावणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

मढी, मोहटादेवी व वृद्धेश्वर यांसारखी तीर्थक्षेत्रे तालुक्याच्या विकासाला चालना देणारी ठिकाणे आहेत. मात्र गर्दीच्या काळात या ठिकाणी वाहतूक कोंडी तसेच भुरट्या चोऱ्यांचे प्रकार होत असल्याने प्रशासनाने कठोर उपाययोजना कराव्यात. अमावस्येच्या दिवशी या तीनही ठिकाणी मोठी गर्दी होत असल्याने एकेरी वाहतूक व्यवस्था लागू करण्याचा विचार करावा, अशी सूचना त्यांनी केली. बंद असलेले पथदिवेही तातडीने सुरू करण्याची मागणी त्यांनी केली. उत्सवाचे पावित्र्य, शांतता व सामाजिक सलोखा कायम ठेवण्यासाठी सर्व गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

गणेश विसर्जनासाठी मोहरी रस्त्यावरील विहीर अधिग्रहित करून त्यात पाणी सोडण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी दिली.

मानाच्या गणपतींच्या विसर्जन मिरवणुकीसाठी प्रशासनाने निश्चित केलेली वेळ न पाळल्यास ठरावीक वेळेनंतर मिरवणूक सुरू करण्याचा प्रस्ताव प्रशासनाच्या विचाराधीन असल्याची चर्चा बैठकीत झाली. मिरवणूक मार्ग तसेच शहरातील प्रमुख चौकांमध्ये सीसीटीव्हीच्या माध्यमातून नजर ठेवण्याची व्यवस्थाही करण्यात येणार आहे.

राज्यातील दुष्काळसदृश परिस्थिती, बाजारपेठेतील मंदी आणि बळीराजासमोरील संकटाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक भान जपत आमदार मोनिका राजळे यांनी सत्कार, हारतुरे व स्वागताच्या पारंपरिक पद्धतीला यावेळी फाटा दिला. त्यांच्या या भूमिकेची उपस्थित मान्यवरांनी दखल घेतली.

दरम्यान, बैठकीनंतर आमदार राजळे यांनी डीजेसह इतर विषयांवर वरिष्ठ पोलीस व प्रशासकीय अधिकाऱ्यांशी बंदद्वार चर्चा केली. मात्र, डीजे बंदीबाबत जिल्हा प्रशासनाने घेतलेला निर्णय कायम राहणार असल्याचे स्पष्ट झाले.

कार्यक्रमाचे स्वागत पोलीस उपनिरीक्षक रेवती भोसले यांनी केले. प्रास्ताविक पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी केले. पोलीस अधिकारी रोहन खंडागळे, निवृत्ती आगरकर, संदीप मुरकुटे, सायकर, गुप्तवार्ता विभागाचे नागेश वाघ, विनोद मासाळकर, नितीन दराडे, महेश रुईकर, निलेश गुंड, आण्णा पवार, संजय जाधव यांच्यासह सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी बैठकीच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

## पिढ्यानपिढ्या शासकीय जमिनीवर वास्तव्य; आदिवासींच्या नावावर जागा करा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक आदिवासी कुटुंबे गावाबाहेर, जंगल परिसरात, गायरान तसेच विविध शासकीय जमिनीवर पिढ्यानपिढ्या वास्तव्य करीत आहेत. मात्र, दीर्घकाळ वास्तव्य करूनही त्यांच्या राहत्या जागेची शासकीय नोंद त्यांच्या नावावर झालेली नाही. त्यामुळे शासनाच्या नियमानुसार पात्र आदिवासी कुटुंबांच्या राहत्या जागा त्यांच्या नावावर करून त्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी आदिवासी महासंघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

देशाला स्वातंत्र्य मिळून ८० वर्षे झाली असतानाही जिल्ह्यातील अनेक आदिवासी वाड्या-वस्त्यांमध्ये अद्याप घरे, पाणी, रस्ते, शिक्षण व आरोग्य यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जंगल व गावाबाहेरील वस्त्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना ये-जा करण्यासाठी व्यवस्थित रस्ते नसल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शासनाच्या नियमानुसार दीर्घकाळ शासकीय जागेवर वास्तव्य करणाऱ्या पात्र व्यक्तींच्या नावावर जागा नियमित करण्याची तरतूद असतानाही अनेक ठिकाणी ग्रामसेवक व तलाठी स्तरावरून आदिवासी समाजाच्या कुटुंबांना आवश्यक माहिती व मार्गदर्शन मिळत नसल्याचा आरोप महासंघाने केला आहे.

ज्या आदिवासी कुटुंबांकडे पुरावे उपलब्ध आहेत, त्यांच्याप्रमाणेच पुरावे नसलेल्या कुटुंबांचाही गावनिहाय सर्वेक्षण करून प्रत्यक्ष वास्तव्याची पडताळणी करावी आणि पात्र कुटुंबांच्या नावावर त्यांच्या राहत्या जागांची नोंद करावी, अशी मागणी आदिवासी महासंघाने केली आहे.

या मागणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना आदिवासी महासंघाच्या प्रदेशाध्यक्ष मंदाकिनी मेंगाळ, दलित महासंघाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. काशिनाथ सुलाखे पाटील, जिल्हाध्यक्ष संजय चांदणे, अनिल मधे, निर्मला पवार, संगीता माळी, संदीप पवार, कुसुम जाधव, सुनील पवार, संदीप दराळे, नवनाथ माळी, नंदलाल पवार, सोमनाथ माळी, संभाजी पवार, परशुराम पवार, तान्हाजी पवार, दीपक पवार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## बुद्धिबळामुळे बुद्धीच्या कौशल्याचा कस लागतो

### बाबासाहेब भोस । श्रीगोंद्यात तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा उत्साहात



**वजीराची चाल देत स्पर्धेचे उद्घाटन**

■ तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन अनोख्या पद्धतीने करण्यात आले. बुद्धिबळाच्या पटाची प्रतिकृती मांडून मान्यवरांनी वजीराची चाल देत स्पर्धेचा शुभारंभ केला. या अनोख्या उद्घाटनाने उपस्थित विद्यार्थी आणि शिक्षकांचे लक्ष वेधून घेतले.

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

बुद्धिबळ हा केवळ मनोरंजनाचा खेळ नसून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना देणारा प्रभावी खेळ आहे. बुद्धिबळामुळे बुद्धीच्या कौशल्याचा कस लागतो. तसेच जीवनातील कठीण प्रसंगांमध्ये योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित होते, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष बाबासाहेब भोस यांनी केले.

अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय, श्रीगोंदा तालुका क्रीडा समिती आणि महादजी शिंदे विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय येथे तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय नियमानुसार झालेल्या या स्पर्धेत विविध वयोगटांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे आणि प्राचार्य दिलीप भुजबळ यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास उपप्राचार्य नितीन थोरात, श्रीकांत थोरात, क्रीडा संचालिका कल्पना बागुल, डॉ. सुदाम भुजबळ, प्राचार्य शहाजी मखरे, पर्यवेक्षक रत्नाकर झिटे, क्रीडा शिक्षक संदीप घावटे, संदीप बिरंगळ, दत्तात्रय शेलार, अक्षय लाकूडझोडे, योगेश गोरखे, अशोक कांडेकर, कोकणी सर, शिवाजीराव नागवडे आदी उपस्थित होते.

स्पर्धेसाठी पंच म्हणून दिपक सुपेकर, विठ्ठल होले आणि अविनाश मोरे यांनी जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन जामदार यांनी केले. आभार नंदकुमार शितोळे यांनी मानले. स्पर्धेचे संपूर्ण नियोजन संजय डफळ यांनी केले. सूत्रसंचालन अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे यांनी केले.

# श्रम व सातत्याच्या बळावर यश निश्चित मिळते

### सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले । श्री स्वामी समर्थ विद्यामंदिरमध्ये गुणगौरव सोहळा

**● पाथर्डी । वीरभूमी–**

श्रम आणि सातत्याच्या बळावर कोणतीही गोष्ट साध्य करता येते. विद्यार्थ्यांनी अभ्यासात एकाग्रता ठेवून कष्ट केल्यास यशाची शिखरे सहज पार करता येतात, असे प्रतिपादन मुंबई क्राईम ब्रँचचे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांनी केले. शहरातील श्री स्वामी समर्थ विद्यामंदिर येथे आयोजित विद्यार्थ्यांच्या गुणगौरव व मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते हाजी हुमायून आतार होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार कैलास ढोले, चैतन्य ग्रुपचे अनंत ढोले आणि शाळेचे मुख्याध्यापक एकनाथ ढोले उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भाऊसाहेब ढोले यांनी ग्रामीण भागातून सुरू झालेला आपला जीवनप्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडला. पोलीस दलातील सहाय्यक आयुक्त पदापर्यंत पोहोचताना आलेल्या अडचणी व आव्हानांना कसे सामोरे गेलो, याचे अनुभव त्यांनी सांगितले.

तुम्ही मनात ठरवले तर कोणतेही काम सोपे होते. एकाग्र चित्ताने अभ्यास करून कामात सातत्य ठेवल्यास यश नक्कीच मिळते, असा मोलाचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

ध्येय साध्य करताना इतरांच्या टीका-टिप्पणीकडे दुर्लक्ष करून आपल्या उद्दिष्टावर लक्ष केंद्रित करण्याचा संदेश देण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना 'बेडकाची गोष्ट' सांगितली. या प्रेरणादायी गोष्टीला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त दाद दिली.

शाळेने शिष्यवृत्ती परीक्षा तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये मिळवलेल्या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करून विद्यार्थी, शिक्षक व शाळेचे कौतुक केले. मुख्याध्यापक एकनाथ ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचेही त्यांनी कौतुक केले. आज या शाळेचे नाव केवळ तालुक्यातच नव्हे, तर जिल्ह्यातही आदराने घेतले जाते. भविष्यात या शाळेतील विद्यार्थी विविध उच्च पदांवर पोहोचतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**महापुरुषांच्या विचारांची दिशा अंगीकारा**

अध्यक्षीय भाषणात हाजी हुमायून आतार यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा अंगीकारण्याचे आवाहन केले. योग्य दिशा आणि विचारांवर ठाम राहिल्यास जीवन यशस्वी होते, असे सांगत त्यांनी सादर केलेल्या शेरोशायरीला




विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी शाळेत फॅन्सी ड्रेस स्पर्धा आणि दहीहंडी कार्यक्रमाचेही भव्य आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अनिता कानडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती सोनाली सोनवणे, प्रवीणा गोल्हार, सुधीर पगारे, स्मिता थोरात, प्रसाद मरकड, बंडू गाडेकर आणि सुनीता गोसावी यांनी विशेष परिश्रम घेतले. सोहळ्यास पालक व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# SPOT NEWS

## जिल्हा ग्राहक आयोगात आता आभासी सुनावणीची सुविधा

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
ग्राहकांच्या तक्रारींच्या सुनावणीची प्रक्रिया अधिक सुलभ, गतिमान आणि आधुनिक करण्याच्या दृष्टीने अहमदनगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगामध्ये आता आभासी पद्धतीने (व्हिडिओ कॉन्फरन्स) सुनावणीची सुविधा उपलब्ध होणार आहे. महाराष्ट्रात जिल्हास्तरावरील ग्राहक आयोगामध्ये प्रथमच ही सुविधा सुरू होत असून, तिचे उद्घाटन शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता टीव्ही सेंटर येथील प्रशासकीय इमारतीतील ग्राहक आयोगाच्या कार्यालयात होणार आहे. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबईचे अध्यक्ष मुकेश व्ही. शर्मा यांच्या हस्ते या आभासी सुनावणी सुविधेचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यावेळी राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबईच्या सदस्य पूनम महर्षी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. ग्राहकांना त्यांच्या तक्रारींचे निवारण करून घेण्यासाठी न्यायव्यवस्थेपर्यंत सहज पोहोचता यावी, तसेच सुनावणीच्या प्रक्रियेत वेळ आणि श्रमाची बचत व्हावी, या उद्देशाने ग्राहक आयोगाच्या कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून अहमदनगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगात व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून सुनावणीची सुविधा सुरू करण्यात येत आहे. ग्राहकांच्या तक्रारींच्या निवारणासाठी देशात त्रिस्तरीय ग्राहक आयोगाची रचना करण्यात आली आहे. जिल्हास्तरावर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, राज्यस्तरावर राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, तर राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग कार्यरत आहे. ग्राहकांना सदोष वस्तू किंवा मूल्य देऊन घेतलेल्या सेवेमध्ये त्रुटी आढळल्यास संबंधित ग्राहक आयोगाकडे तक्रार दाखल करता येते.

## राष्ट्रवादीच्या महिला आघाडीला नवी ऊर्जा; शहर कार्यकारिणीत नव्या नियुक्त्या

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अहिल्यानगर शहर महिला आघाडीची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने शहर महिला अध्यक्ष अर्चना गायकवाड यांनी प्रदेश अध्यक्षा रोहिणीताई खडसे यांच्या मान्यतेने विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या. खासदार निलेश लंके, जिल्हाध्यक्ष सीताराम काकडे, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष अथर खान, कार्याध्यक्ष समीर पठाण, नगरसेवक योगीराज गाडे, जिल्हा उपाध्यक्ष मतीन शेख, गारुडकर सर, रामभाऊ वाणी, सरपंच शरद पवार, रामभाऊ झीने, शहर कार्याध्यक्ष अजहर शेख, असिर शेख आदींच्या उपस्थितीत नियुक्तीपत्रे देण्यात आले. अहिल्यानगर शहर जिल्हा उपाध्यक्षपदी वेणूबाई विठ्ठल वाणी, महासचिवपदी वर्षा सांतवन सगलगिरे, शहर सचिवपदी ज्योती भोसले व अलका वाकडे, तर सहसचिवपदी अर्चना दत्तू शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली. महिलांना राजकीय, सामाजिक व संघटनात्मक क्षेत्रात अधिकाधिक संधी देण्याच्या पक्षाच्या भूमिकेनुसार या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर पक्षाची विचारधारा जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासह महिलांच्या विविध प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. महिला शक्तीला संघटित करून पक्षाची ताकद बूथस्तरापर्यंत वाढविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. 'महिला सशक्तीकरण, संघटन बळकटीकरण आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी संघर्ष' या भूमिकेतून आगामी काळात महिला आघाडीच्या माध्यमातून विविध सामाजिक व संघटनात्मक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# पावसाने मारलेल्या दडीने पोळ्याचा उत्साह ओसरला

**आर्थिक अडचणींवर मात करत शेतकऱ्यांनी जपली परंपरा । शेवगावात बैल, गायी, घोडे व ट्रॅक्टरची मिरवणूक**

**शेवगाव । वीरभूमी–**
तालुक्यात गेल्या दोन महिन्यांपासून पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. याचा परिणाम बैल पोळा सणावरही जाणवला. पशुधनाची संख्या कमी झाल्याचे चित्र दिसून आले. आर्थिक अडचणी असतानाही शेतकऱ्यांनी उसनवारी करून वर्षभर शेतीच्या कामात साथ देणाऱ्या बैलांना सजविले आणि निरुत्साहाच्या वातावरणात पोळा सणाची परंपरा जपली.



शहरातील आठवडे बाजारात पोळ्यानिमित्त खरेदीसाठी शेतकऱ्यांची गर्दीही यंदा कमी होती. त्यामुळे बैलांसाठी लागणाऱ्या घुंगरमाळा, रंगीत गोंडे, रंग तसेच शिंगांसाठी वापरल्या जाणाऱ्या हिंगूळ आदी साहित्याच्या विक्रीवर परिणाम झाला. मात्र, शेतकऱ्यांनी उपलब्ध साधनांतून बैलांची आकर्षक सजावट करून त्यांची पूजा केली. बैलांना पुरणपोळीचा गोड घास भरवून त्यांचे दर्शन घेतले. तसेच धरणीमातेला श्रीफळ अर्पण करून धनधान्य पिकण्यासाठी मेघराजाला प्रार्थना केली.

शहरातील महात्मा सार्वजनिक वाचनालयासमोरील जुन्या बाजारतळावर नगरपरिषदेच्या वतीने गुरुवार, दि. १० रोजी पोळा सणाचे आयोजन करण्यात आले होते. परिसरातील शेतकऱ्यांनी बैल, गायी, घोडे तसेच ट्रॅक्टर सजवून ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक काढली. यावेळी नगरपरिषदेच्या वतीने शेतकरी व पशुधन मालकांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास शिवसेनेचे नेते अरुण मुंढे, पंचायत समितीचे माजी सभापती अरुण लांडे पा., अशोक अहुजा, पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, नगरसेवक वजीर पठाण, संतोष जाधव, नीरज लांडे, नगरपरिषदेचे प्रशासकीय अधिकारी सुनील पगारे, सागर सुरवसे, सतीश मगर, दत्तात्रय फुंदे, कैलास तिजोरे, शब्बीर शेख, विजय धनवडे यांच्यासह विविध पदाधिकारी, शेतकरी व नागरिक उपस्थित होते.

## बाबासाहेब बोडखेंच्या नेतृत्वाखाली माध्यमिक शिक्षक सोसायटी प्रगतीपथावर : आ. संग्राम जगताप

**अहिल्यानगर । वीरभूमी –**
अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या चेअरमनपदी बिनविरोध नियुक्ती झाल्याबद्दल शिक्षक नेते बाबासाहेब बोडखे यांचा आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. बाबासाहेब बोडखे हे चळवळीतून घडलेले नेतृत्व असून, सामाजिक कार्यातही त्यांचा सातत्याने पुढाकार राहिला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली माध्यमिक शिक्षक सोसायटी निश्चितच प्रगतीपथावर जाईल, असा विश्वास आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केला. यावेळी प्रा. माणिक विधाते, सोसायटीचे माजी चेअरमन आप्पासाहेब शिंदे, प्रा. सुधाकर सुंबे, संचालक महेंद्र हिंगे, राजेंद्र कोतकर, प्रा. शिवाजी घाडगे, प्रा. दत्तात्रय दरेकर, प्रा. निलेश बांगर, सचिव स्वप्निल इथापे, दीपक आमटे आदी उपस्थित होते.

पुढे आमदार जगताप म्हणाले की, अवघ्या काही दिवसांच्या कालावधीत संस्थेत तब्बल २२ कोटी ४२ लाख रुपयांच्या ठेवी जमा करून संस्था स्वभांडवली करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. हा उपक्रम अत्यंत महत्त्वाकांक्षी असून, त्याला सभासदांकडून मिळत असलेला प्रतिसाद कौतुकास्पद आहे. संस्थेवरील अनावश्यक खर्च कमी करून उपलब्ध आर्थिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करण्याच्या दिशेने सुरू असलेले कामही महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

बाबासाहेब बोडखे म्हणाले की, माध्यमिक शिक्षक सोसायटीमध्ये परिवर्तन मंडळाची सत्ता आल्यानंतर सभासद हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन संस्थेचा कारभार सुरू करण्यात आला आहे. संस्थेचा कारभार अधिक काटकसरीने करण्याबरोबरच अनावश्यक आणि वाढीव खर्चाला फाटा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संस्थेच्या आर्थिक स्थितीला अधिक बळकटी देण्यासाठी विविध उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. संस्था स्वभांडवली करण्याच्या उद्देशाने सभासदांच्या सहकार्याने वाटचाल सुरू आहे. संस्थेच्या माध्यमातून सभासदांना अधिक चांगल्या आर्थिक सुविधा उपलब्ध करून देतानाच कर्जावरील व्याजदर कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. यासाठी ऐच्छिक ठेव वाढ अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानाला सभासदांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, अवघ्या काही दिवसांतच २२ कोटी ४२ लाख रुपयांच्या ठेवी संस्थेत जमा झाल्या आहेत, अशी माहिती बोडखे यांनी दिली. सभासदांनी दाखविलेला विश्वास आणि सहकार्य हे संस्थेच्या पुढील वाटचालीसाठी महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा. माणिक विधाते यांनी बाबासाहेब बोडखे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. शिक्षक सोसायटीच्या माध्यमातून सभासदांच्या हिताचे निर्णय घेऊन संस्था अधिक सक्षम करण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना सर्वांचे सहकार्य मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## दुर्गम सोंगाळवाडी शाळेतील विद्यार्थ्यांनी मातीला आकार देतघडवला पर्यावरणपूरक बाप्पा!

**अकोले । वीरभूमी–**
गणेशोत्सवाचे औचित्य साधत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोंगाळवाडी (पिंपळगाव नाकविंदा) येथे विद्यार्थ्यांनी शाडूच्या मातीपासून आकर्षक गणेशमूर्ती तसेच बैलपोळ्यासाठी बैलांच्या प्रतिकृती साकारल्या. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्वतःच्या हाताने साकारलेल्या गणेशमूर्ती पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.



मूर्ती तयार करण्यासाठी सकाळपासूनच विद्यार्थ्यांची लगबग सुरू होती. विद्यार्थ्यांनी परिसरातून शाडूची व नैसर्गिक माती गोळा करून ती शाळेत आणली. माती मळून तिला आकार देताना विद्यार्थी अक्षरशः रमून गेले होते. आपल्या कल्पकतेचा वापर करून त्यांनी गणेशमूर्ती तसेच बैलांच्या प्रतिकृती साकारल्या. स्वतःच्या हाताने बाप्पाची मूर्ती घडवण्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होता. या मूर्तींना पुढे नैसर्गिक रंगांनी सजविण्यात येणार आहे.

शहरातील किंवा मोठ्या शाळांमध्ये गणेशमूर्ती तयार करण्याच्या कार्यशाळा आयोजित केल्या जातात. त्यामुळे हा उपक्रम नवीन नसला तरी दुर्गम आणि आदिवासीबहुल वाडीतील शाळेत प्रथमच अशा प्रकारचा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना या उपक्रमातून मिळालेला आनंद शब्दांत व्यक्त करता येणार नाही, असे मुख्याध्यापक बाळू धिंदळे आणि शिक्षिका समता कराळे यांनी सांगितले.

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींमुळे होणारे जलप्रदूषण टाळण्यासोबतच विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा उद्देश आहे. 'मातीपासून मूर्ती, पर्यावरणाची जपणूक आणि विद्यार्थ्यांच्या हातून सर्जनशील निर्मिती' असा या उपक्रमाचा सुंदर संदेश आहे, असे शिक्षण विस्तार अधिकारी सविता कचरे यांनी सांगितले.

बदली प्रक्रियेतून नवीन शिक्षक हजर झाल्यानंतर हळूहळू सोंगाळवाडी शाळेचे रूप बदलत आहे. शाळेत स्वातंत्र्यदिन सांस्कृतिक कार्यक्रमांसह उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानंतर दहीहंडी व गोपाळकाल्याचा उत्सवही आनंदात साजरा झाला. आता बैलपोळा आणि गणेशोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून कला, संस्कृती आणि पर्यावरण संवर्धनाचा अनुभव मिळाला आहे.

दुर्गम भागातील या शाळेत विद्यार्थ्यांचे अनुभवविश्व समृद्ध करणारे आणि त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारे विविधांगी उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. उत्साही मुख्याध्यापक बाळू धिंदळे आणि उपक्रमशील शिक्षिका समता कराळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हा उपक्रम साकारला.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी दोन्ही शिक्षकांकडून राबविण्यात येत असलेल्या उपक्रमशीलतेचे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामदास सोंगाळ आणि केंद्रप्रमुख सुयोग वाकचौरे यांनी कौतुक केले. शाळेतील विविधांगी उपक्रमांचे पालक आणि ग्रामस्थांकडूनही स्वागत होत आहे.

## पावसाअभावी वाया गेलेल्या पिकांचे पंचनामे करण्याची अकोले ग्राहक पंचायतची मागणी

**शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी**

**अकोले । वीरभूमी –**
अकोले आदिवासी तालुक्यात यंदाच्या पावसाळ्यात अनेक भागांत पर्जन्यमान कमी झाल्याने भात, सोयाबीन, बाजरी, भुईमूग, मका व कडधान्यांची पिके सुकून, जळून व करपून जात आहेत. पावसाअभावी वाया गेलेल्या पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत व नुकसानभरपाई द्यावी, या मागणीचे निवेदन निवासी नायब तहसीलदार किसन लोहरे यांना देण्यात आले.

याबाबतची माहिती ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलीक, माधवराव तिटमे आणि सचिव राम रूद्रे यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यातील शेतकरी दररोज आभाळाकडे पाहून पावसाची प्रतीक्षा करीत आहेत. महिना-दीड महिना उलटूनही पावसाने दडी मारल्याने तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. हातातोंडाशी आलेली पिके पावसाअभावी सुकत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

अकोले तालुक्यातील आदिवासी भागात काही ठिकाणी अतिवृष्टी झाली होती. मात्र, त्यानंतर पावसाने उघडीप दिल्याने तेथील भात व इतर पिकेही सुकून, जळून व करपून जात आहेत. पावसाअभावी शेतकऱ्यांसमोर गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकरी, पशुधन आणि सर्वसामान्य नागरिकांना तातडीने आर्थिक मदत व दिलासा देण्याची मागणी करण्यात आली आहे.

अकोले तालुक्यातील ई-पिक पाहणी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन करण्यात यावी. पावसाअभावी वाया गेलेल्या पिकांचे तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

निवेदनावर ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलीक, माधवराव तिटमे, अध्यक्ष दत्ता शेनकर, कार्याध्यक्ष महेशराव नवले, सचिव राम रूद्रे, भाऊसाहेब वाकचौरे, रामदास पांडे, अनंत घाणे, मोहन मुंढे, अशोक उघडे, रामदास पवार, धनंजय संत, रोहिदास वाल्हेकर, अजय शेळके, मुरलीधर पथवे, पांडुरंग पथवे, भाऊसाहेब वाळुंज, रामहारी तिकांडे, भाऊसाहेब गोर्डे, सुरेश गभाले, गणपत थिगळे, प्रकाश कोरडे, राजेंद्र घायवट, ज्ञानेश्वर पुंडे, जालिंदर बोडके, प्रमोद मंडलीक, कैलास तळेकर आदींची नावे आहेत.

निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, जिल्हाधिकारी आणि तालुका कृषी अधिकारी यांना पाठविण्यात आल्या आहेत.

# पॉक्सो कायद्याचा आग्रह धरू; बालकांचे जीवन सुरक्षित करू!

**'स्नेह बाल आधार'ची जिल्ह्यात जनजागृती । पारनेर पोलीस ठाण्यात टीमची भेट**

**पारनेर । वीरभूमी–**
अत्याचारित आणि संकटग्रस्त बालकांना तात्काळ आधार, संरक्षण आणि न्याय मिळवून देण्यासाठी स्नेहालय संस्थेच्या वतीने 'स्नेह बाल आधार' हा उपक्रम अहिल्यानगर जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत जनजागृती अभियान राबविताना स्नेह बाल आधारच्या टीमने पारनेर पोलीस ठाण्यास भेट दिली.



यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे, स्नेह बाल आधारचे प्रकल्प व्यवस्थापक संतोष धर्माधिकारी, शाहिद शेख, पूजा दहातोंडे, सीमा माळी आणि पत्रकार भगवान गायकवाड उपस्थित होते.

यावेळी शाहिद शेख यांनी स्नेह बाल आधारच्या कामकाजाची सविस्तर माहिती दिली. लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२ अर्थात पॉक्सो कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हा शासनमान्य उपक्रम कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रकल्पाचा लाभ १८ वर्षांखालील मुला-मुलींना मिळू शकतो. लैंगिक अत्याचाराला बळी पडलेली किंवा त्याची शक्यता असलेली बालके, अनैतिक मानवी वाहतुकीचे बळी, बालमाता, बालविवाह झालेले किंवा होण्याची शक्यता असलेली मुले-मुली, बालवेश्याव्यवसायात ढकलली गेलेली बालके, तसेच सायबर क्राईम, समाजमाध्यमे आणि मोबाईलच्या गैरवापरातून लैंगिक शोषण होत असलेल्या बालकांना या उपक्रमातून मदत केली जाते.

प्रकल्पांतर्गत अत्याचारित बालकांना तात्काळ वैद्यकीय मदत व योग्य उपचार, सुरक्षित निवारा आणि काळजी, तसेच कायदेशीर लढ्यासाठी वकील उपलब्ध करून देण्यावर भर दिला जातो. बालकल्याण समितीचे सहकार्य मिळवून देण्याबरोबरच मानसिक आरोग्यासाठी क्लिनिकल सायकोलॉजिस्ट आणि सायकोथेरपिस्टची मदतही उपलब्ध करून दिली जाते.

अत्याचारित बालकांचे कौटुंबिक व सामाजिक पुनर्वसन करून त्यांना सक्षम बनविणे हेही प्रकल्पाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. पॉक्सो कायद्याबाबत समाजात व्यापक जनजागृती करून बालकांच्या सुरक्षिततेसाठी नागरिकांनी सजग राहावे, असे आवाहन करण्यात आले. तात्काळ आमच्याशी संपर्क करा, अत्याचारित बालकाचे रक्षण करा. आपली थोडीशी सजगता एखाद्या बालकाचे जीवन वाचवू शकते, असे संस्थेने म्हटले आहे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाते. संस्था अहोरात्र मदतीसाठी उपलब्ध असून, मदतीसाठी हेल्पलाइन क्रमांक : ९०११०२०१७५ यावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# भुईकोट किल्ला विकासासाठी सुजय विखे पाटलांचेच प्रयत्न; श्रेयासाठी निलेश लंकेंनी स्टंटबाजी करु नये

## उपमहापौर धनंजय जाधव यांचा निलेश लंके यांच्यावर निशाणा | दोन वर्षांचा घटनाक्रम कागदपत्रांसह जनतेसमोर मांडा

**● अहिल्यानगर | वीरभूमी–**
ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या विकासासाठी जिल्हा प्रशासन आणि भारतीय लष्कर प्रशासनामध्ये सामंजस्य करार झाल्याचे स्वागत आहे. या करारामुळे किल्ल्याच्या विकासकामांचा मार्ग मोकळा झाला असून, अहिल्यानगरच्या ऐतिहासिक वारशाचे संवर्धन आणि पर्यटन विकासाला चालना मिळणार आहे. मात्र, या कामाचे श्रेय घेण्यासाठी सुरू झालेली राजकीय स्टंटबाजी दुर्दैवी असल्याची टीका अहिल्यानगरचे उपमहापौर धनंजय जाधव यांनी केली.

भुईकोट किल्ल्याच्या विकासासाठी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. हा दावा केवळ राजकीय आरोप नसून, संपूर्ण प्रक्रियेतील कागदपत्रे आणि तारखा त्याची साक्ष देतात, असे जाधव यांनी सांगितले. त्यामुळे खासदार निलेश लंके यांनी गेल्या दोन वर्षांचा घटनाक्रम तपासूनच विकासकामाचे श्रेय घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

**२५ कोटींच्या विकासकामांना २०२४ मध्येच मंजुरी**

भुईकोटच्या विकासाचा विषय अलीकडचा नसून, ६ मार्च २०२४ रोजी केंद्र सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने अहमदनगरची "Culture Heritage' श्रेणीमध्ये Challenge Based Destination Development (CBDD) अंतर्गत निवड केली होती. त्याचवेळी भुईकोट किल्ल्यासाठी २५ कोटी रुपयांच्या विकासकामांना मंजुरी मिळाली होती. त्यामुळे या प्रकल्पाची सुरुवात नेमकी कुठून झाली, हे स्पष्ट असल्याचे जाधव यांनी म्हटले.

किल्ल्याच्या काही भागावर संरक्षण विभागाचे अधिकार असल्याने मंजूर विकासकामे प्रत्यक्ष सुरू करण्यासाठी संरक्षण विभागाची परवानगी हा महत्त्वाचा टप्पा होता. त्यासाठी तत्कालीन खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच तत्कालीन संरक्षणमंत्री



राजनाथ सिंह यांच्याकडे पत्रव्यवहार करून आवश्यक परवानगीचा प्रश्न मांडला होता.

यानंतर पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनीही प्रक्रिया पुढे नेण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. २३ मे २०२६ रोजी शिर्डी येथील डिफेन्स क्लस्टरच्या कार्यक्रमादरम्यान त्यांनी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांना पत्र देऊन भुईकोट किल्ल्याच्या पर्यटन विकासकामांसाठी आवश्यक संरक्षण विभागाची मंजुरी आणि MOU प्रक्रिया लवकर पूर्ण करण्याची मागणी केली.

**संरक्षण मंत्रालयाची मंजुरी; लष्कराकडून 'गो अहेड'**

त्यानंतर २५ जून २०२६ रोजी संरक्षण मंत्रालयाने महाराष्ट्र पर्यटन संचालनालयासोबत सामंजस्य करार करण्यास मान्यता दिली. संरक्षण जमिनीची मालकी किंवा दर्जा बदलणार नाही तसेच त्या जमिनीवरील कोणतेही हक्क हस्तांतरित होणार नाहीत, अशा अटींसह ही मान्यता देण्यात आली.

यानंतर २ जुलै २०२६ रोजी भारतीय लष्कराकडून भुईकोट किल्ल्यातील पर्यटन विकासकामांना अंतिम "Go Ahead Permission' देण्यात आली. त्यामुळे संरक्षण विभागाशी संबंधित महत्त्वाचा अडथळा दूर होऊन विकासकामे प्रत्यक्ष सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला.

**पत्रव्यवहार केला असेल तर त्याचे फलितही सांगा**

गेल्या दोन वर्षांत नेमके काय झाले, हे कागदपत्रांसह जनतेसमोर मांडले पाहिजे. केवळ अंतिम चजण झाल्यानंतर श्रेय घेण्यासाठी पुढे येणे योग्य नाही, अशी टीका जाधव यांनी केली.

खासदार निलेश लंके यांनी संरक्षणमंत्र्यांशी पत्रव्यवहार केल्याचा दावा केला जात असेल, तर त्याचे स्वागतच आहे. मात्र, त्या पत्रव्यवहारानंतर कोणता निर्णय झाला, कोणती प्रशासकीय प्रक्रिया पुढे सरकली, याचे उत्तरही जनतेला मिळाले पाहिजे. केवळ पत्र दिल्याचे सांगणे आणि त्यातून प्रत्यक्ष काय निष्पन्न झाले, हे न सांगणे याला पाठपुरावा म्हणता येणार नाही, असे जाधव यांनी स्पष्ट केले.

**भुईकोट कोणत्याही एका पक्षाचा नाही**

भुईकोट किल्ला हा कोणत्याही एका पक्षाचा किंवा व्यक्तीचा विषय नसून, तो अहिल्यानगरच्या इतिहासाचा आणि अस्मितेचा ठेवा आहे. किल्ल्याचा विकास व्हावा, पर्यटन वाढावे आणि ऐतिहासिक वास्तूचे संवर्धन व्हावे, हीच आमची भूमिका आहे. मात्र, एखाद्या कामासाठी सुरुवातीपासून पाठपुरावा करणाऱ्यांचे योगदान नाकारून अंतिम टप्प्यातील निर्णयाचे राजकीय श्रेय घेणे योग्य नाही, असे जाधव यांनी सांगितले.

राजकारणात दावे अनेक करता येतात; मात्र भुईकोटच्या विकासाचा घटनाक्रम कागदपत्रांमध्ये स्पष्ट आहे. श्रेयासाठी कितीही स्टंटबाजी केली, तरी शेवटी कागदपत्रेच बोलणार आहेत, असा टोला उपमहापौर धनंजय जाधव यांनी लगावला.

## भांडगाव शाळेने सुरु केलेल्या पुस्तकदानातून ज्ञानदान उपक्रमाला गणेश शेलार यांचेकडून १५२५ रुपये किंमतीची ११ पुस्तके भेट

**● पारनेर | वीरभूमी–**
विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञानवृद्धी व्हावी आणि वाचन संस्कृतीला चालना मिळावी, या उद्देशाने भांडगाव शाळेने सुरू केलेल्या पुस्तकदान चळवळीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



भांडगाव शाळेचे मुख्याध्यापक अप्पासाहेब नरवडे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून ग्रामस्थ, पालक, माजी विद्यार्थी आणि पुस्तकप्रेमींना शाळेच्या ग्रंथालयासाठी पुस्तके दान करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष गणेश शेलार यांनी स्वतःपासून या उपक्रमाची सुरुवात केली.

शेलार यांनी १,५२५ रुपये किमतीची ११ पुस्तके शाळेच्या ग्रंथालयासाठी मुख्याध्यापक अप्पासाहेब नरवडे यांच्याकडे सुपूर्द केली. त्यांच्या या उपक्रमाचे शाळेच्या वतीने कौतुक करण्यात आले. तसेच भविष्यात शाळेच्या वाचनालयासाठी आवश्यक फर्निचर उपलब्ध करून देण्याचा मानसही शेलार यांनी व्यक्त केला.

विविध विषयांवरील पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच अवांतर वाचनाची संधी मिळणार आहे. पुस्तकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, विचारशक्ती, भाषिक कौशल्य आणि आत्मविश्वास विकसित होण्यास मदत होणार आहे.

एक पुस्तक म्हणजे अनेक विचार, नवी प्रेरणा आणि ज्ञानाचा प्रकाश, या भावनेतून सुरू झालेली ही चळवळ विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. गावातील नागरिक, पालक, माजी विद्यार्थी आणि पुस्तकप्रेमींनी पुढे येऊन शाळेच्या ग्रंथालयासाठी पुस्तके दान करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

पुस्तक द्या, ज्ञान द्या; विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना नवी दिशा द्या! या संदेशातून पुस्तकदान चळवळीचा उद्देश अधोरेखित होत आहे.

# जवळ्यात बिबट्यांचा धुमाकूळ; कुत्र्यांचा फडशा

## शेतवस्त्यांमध्ये रात्रीचा मुक्काम | अंगणात लोखंडी खाटेखाली बिबट्या बसल्याने नागरिकांमध्ये भीती

**● निघोज | वीरभूमी–**
जवळा परिसरात बिबट्यांचा संचार दिवसेंदिवस वाढत असून, जवळा, देवीभोयरे, निघोज, वडनेर व कुंड वस्ती परिसरात किमान पाच ते सहा बिबटे असल्याचा दावा नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे रात्री–अपरात्रीच नव्हे, तर दिवसा शेतात जाण्यासाठीही नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.





जवळा – शिरूर महामार्गालगत सालके वस्ती परिसरात राहणारे किसन बरशिले यांच्या घराच्या परिसरात गेल्या तीन–चार दिवसांपासून बिबट्याचा वावर आहे. बिबट्या घराच्या परिसरातच नव्हे, तर अंगणात ठेवलेल्या लोखंडी खाटेखालीही बसत असल्याचे बरशिले कुटुंबीयांचे म्हणणे आहे. त्यामुळे कुटुंबीयांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. घरातील लहान मुले अंगणात खेळत असतात, तर वृद्ध व्यक्तीही ओट्यावर बसत असल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली आहे.

या प्रकारामुळे गेल्या तीन–चार दिवसांपासून परिसरातील नागरिकांच्या झोपा उडाल्या आहेत. गावातील तसेच माळवाडी–पठारे वस्ती परिसरात बिबट्यांनी कुत्र्यांची शिकार केल्याच्या घटना घडल्या आहेत. दिवसा उसाच्या शेतात दडी मारून बसणारे बिबटे रात्री भक्ष्याच्या शोधात डोंगर–दऱ्यांऐवजी मानवी वस्तीकडे येत असल्याचे नागरिक सांगतात.

बिबटे मानवी वस्तीजवळून वावरताना दिसत असून, अनेक वेळा नागरिक नकळत त्यांच्या जवळून जात असल्याचेही सांगितले जाते. अद्याप जवळा परिसरात बिबट्या व माणूस यांच्यात थेट संघर्ष झालेला नसला, तरी बिबट्यांनी शेळ्या, मेंढ्या, कुत्रे तसेच इतर प्राण्यांची शिकार सुरूच ठेवली आहे.

जवळा परिसरातील वेगवेगळ्या ठिकाणी बिबट्यांचा वाढता संचार पाहता नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे वनविभागाने तातडीने उपाययोजना करून नागरिकांना संरक्षण द्यावे, अशी मागणी होत आहे.

दोन दिवसांपूर्वी देवीभोयरे येथे एक बिबट्या पकडण्यात आला असला, तरी परिसरातील बिबट्यांची दहशत कमी झालेली नाही. जवळा, निघोज, वडनेर, कुंड तसेच देवीभोयरे परिसरात किमान पाच ते सहा बिबटे रात्रंदिवस फिरत असल्याचे नागरिक सांगतात.

निघोज परिसरातील लंके वस्तीवर दोन बिबट्यांनी एका कुत्र्याचा फडशा पाडल्याची घटना घडली आहे. खंडोबा पाऊतके परिसर, लंके वस्ती आणि ढवळे वस्ती येथे पिंजरे लावून बिबट्यांचा बंदोबस्त करावा. नागरिकांसह पाळीव प्राण्यांचेही संरक्षण करण्यासाठी वनविभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# जिल्हा परिषद शाळांचे स्ट्रक्चरल, सेफ्टी ऑडिट करा!

## अकोल्यातील शिक्षक प्रतिनिधींची शिक्षण सहसंचालकांकडे मागणी | धोकादायक बांधकामे निर्लेखित करून नवीन इमारतींसाठी निधी द्यावा

**● अकोले | वीरभूमी–**
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राज्यभरातील शाळांमधील वर्गखोल्या, किचन शेड, पाण्याच्या टाक्या आणि स्वच्छतागृहांचे स्ट्रक्चरल व सेफ्टी ऑडिट करावे. धोकादायक बांधकामे तातडीने निर्लेखित करून त्या ठिकाणी नवीन बांधकामासाठी आगामी अर्थसंकल्पात भरीव आर्थिक तरतूद करावी, अशी मागणी अकोले तालुक्यातील शिक्षक प्रतिनिधींनी शासनाकडे केली.

शैक्षणिक गुणवत्तेशी थेट संबंधित नसलेल्या ॲप व पोर्टलवर माहिती भरण्याची सक्ती मुख्याध्यापक आणि शिक्षकांवर करू नये, अशी मागणी राज्याचे शिक्षण सहसंचालक रमाकांत काठमोरे यांच्याकडे करण्यात आली. राज्याचे शिक्षण आयुक्त यांनी 'माहितीचा वार शनिवार' असे निर्देश दिलेले असतानाही केंद्र व तालुका पातळीवरून विविध माहिती मागवली जात असल्याने हा प्रकार राज्यस्तरीय निर्देशांशी विसंगत असल्याचे शिक्षकांनी निदर्शनास आणून दिले.

'चला शाळेत जाऊया' या शालेय शिक्षण विभागाच्या विशेष उपक्रमानिमित्त शिक्षण सहसंचालक रमाकांत काठमोरे अकोले तालुका दौऱ्यावर आले होते. बदगी व वाशेरे येथील शाळांची सविस्तर पाहणी केल्यानंतर अकोले पंचायत समितीच्या सभागृहात झालेल्या शिक्षण विभागाच्या बैठकीत त्यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर शिक्षक भवनात निवडक शिक्षकांशी त्यांनी वार्तालाप केला. प्रत्यक्ष काम करताना भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांकडे शिक्षकांनी त्यांचे लक्ष वेधले. यावेळी अकोल्याचे गटशिक्षणाधिकारी दीपक धुमाळ आणि ज्येष्ठ शिक्षण विस्ताराधिकारी बाळासाहेब दोरगे उपस्थित होते.



शिक्षक पात्रता परीक्षा संदर्भात तामिळनाडूच्या धर्तीवर शिक्षकांना दिलासा देण्यासाठी शिक्षण संचालनालयाने शासनाकडे प्रस्ताव सादर करावा, शासकीय शाळांना मोफत वीजपुरवठा करावा, शिक्षकांकडून करून घेतल्या जाणाऱ्या अशैक्षणिक कामांमुळे शैक्षणिक वेळापत्रकावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासगट स्थापन करावा आणि त्याच्या निष्कर्षांच्या आधारे आवश्यक धोरणात्मक उपाययोजनांची शिफारस शासनाकडे करावी, अशी मागणी शिक्षकांनी केली.

बीएलओचे काम वर्षभर चालणारे असल्याने त्यासाठी शिक्षकांची नियुक्ती करू नये. शिक्षकांना दीर्घकालीन निवडणूकविषयक कामातून वगळून त्यासाठी स्वतंत्र मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, अशी मागणीही करण्यात आली. तसेच तालुका, जिल्हा आणि विभागीय स्तरावर शालेय शिक्षण विभागाच्या कार्यक्रमांना समांतर कोणतेही उपक्रम किंवा माहिती संकलन केले जाऊ नये. याबाबत राज्यस्तरावरून स्पष्ट निर्देश देण्यात यावेत, अशी मागणी शिक्षकांनी केली.

नगर जिल्ह्यात गॅस वितरकांकडून सिलेंडर उपलब्ध करून न देता मुख्याध्यापकांची अडवणूक केली जात असल्याने शालेय पोषण आहार शिजविण्यात अडचणी येत असल्याची तक्रारही शिक्षकांनी केली. निवेदनातील उचित मागण्यांबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल, असे काठमोरे यांनी सांगितले.

क्विव्ह टीचर्स फोरमचे संयोजक भाऊसाहेब चासकर यांनी विविध प्रश्नांकडे लक्ष वेधले. चर्चेत गोरख देशमुख, रमेश खरबस, जयश्री जगताप, प्रतिभा मगर, नरेंद्र राठोड, बाळू खाडे, भागवत लेंढे आणि राजेंद्र भाग्यवंत यांनी सहभाग घेतला. रवींद्र रुपवते यांनी स्वागत केले, तर राजू मोहिते यांनी आभार मानले.

यावेळी चित्रकार मीनानाथ खराटे, गणपत सहाणे, भागवत लेंडे, भाऊसाहेब कासार, संतोष शिंदे, चंद्रभान मेंगाळ, रोहिदास जाधव, ज्ञानेश्वर जोर्वेकर आदी शिक्षक उपस्थित होते.

### शाळांचे चांगले उपक्रम समाजासमोर आणा

■ शासकीय शाळांमधील वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम, प्रयोग आणि शैक्षणिक गुणवत्ता शिक्षकांनी समाजासमोर मांडली पाहिजे, असा आग्रह शिक्षण सहसंचालक रमाकांत काठमोरे यांनी धरला. नवीन शैक्षणिक धोरणानुसार अकोले तालुक्यात जिल्हा परिषदेच्या शाळांना जोडून सुरू करण्यात आलेल्या पूर्वप्राथमिक वर्गांचे त्यांनी कौतुक केले.